
वेदना
अस्त सूर्याचा पाहुनी, मी किरणांसाठी झुरतो
ती वेळ सुरु परतीची, थवा घरट्यास उडतो ॥ १ ॥
सांजेचा दीप तोही, एकलाच गाभारी जळतो
दिव्यास सोबत माझी, तो वातीत काजळतो ॥ २ ॥
भाव दाटला नयनी, अलगद गाली ओघळतो
जणू सन्यस्त होऊनी, मी ओठी दु:ख थोपवतो ॥ ३ ॥
गोठली वेदना एकांती, मी स्मृतींमागे पळतो
झाकून भावना सारी, मी मलाच रे सावरतो ॥ ४ ॥
आरशास पाहता फिरुनी, तो नकळत काही सुचवतो
वाटे चेहराच मला माझा, काय असा फसवतो ॥ ५ ॥
© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78